ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २९ एप्रिल, १९५९ | अंक १७

## विविध माहिती

**महात्मा गांधी म्युझिअम**—गांधी-स्मारक निधीतर्फे देशांत सात ठिकाणीं गांधी म्युझिअम स्थापन करण्यांत येणार आहेत. त्यापैकीं पहिलें म्युझिअम मदुरा येथें पंतप्रधान नेहरू ह्यांनीं खुलें केलें. म्युझिअममध्यें गांधींच्या लिखाणांचा पुस्तकसंग्रहालय, त्यांच्या हस्ताक्षरांचीं छायाचित्रित पत्रें, इत्यादि वस्तू आहेत. त्याच्या स्थापनेसाठीं २७ लाख रुपये खर्च आला आहे.

**रबरी तळ असलेलीं पायतणें**— १९५८ सालीं रबरी तळ असलेल्या पायतणांचें उत्पादन घटलें. गेल्या सालीं एकूण सुमारें ३,६०,६५,५११ बूट जोड्यांचें उत्पादन करण्यांत आलें. १९५७ सालीं ३,६८,९१,७६७ बूट जोड्यांचें उत्पादन करण्यांत आलें होतें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमामध्यें ठरविण्यांत आलेलें ५,००,००,००० जोड्यांचें उद्दिष्ट तरीसुद्धां गांठण्यांत येईल असा अंदाज आहे.

**इतिहास संशोधनाला साह्य**—विदर्भ संशोधनमंडळाच्या रौप्यमहोत्सवांत भाषण करतांना इतिहाससंशोधक श्री. द. वा. पोतदार ह्यांनीं संशोधनकार्याला राज्य व मध्य सरकारांनीं अधिक मदत द्यावी अशी विनंती केली. त्याचप्रमाणें मोठ्या धरणांच्या कामांत इतिहासकालीन अवशेष पाण्याखालीं जात असल्यामुळें इतिहास-संशोधकांचा सल्ला घेण्यांत यावा, असेंहि ते म्हणाले.

**पंजाबमधील गव्हाचें उत्पादन**—चालू हंगामांत गव्हाच्या उत्पादनाच्या बाबतींत पंजाब उच्चांक गाठील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत येत आहे. गव्हाचें पीक सुमारें २२ लाख टन येईल. राज्याच्या गरजा भागून सुमारें ३०,००० टन गहूं बाहेर पाठविण्यासाठीं शिल्लक उरेल असा ह्याचा अर्थ आहे.

**एंजिनिअरिंगच्या मालाची निर्यात**— एंजिनिअरिंगच्या धंद्याच्या मालाची निर्यात वाढविण्याची शक्यता अजमावण्यासाठीं सहा हिंदी प्रतिनिधींचें मंडळ इंडोनेशिआ, सिंगापूर, मलाया, न्यूझीलंड, इत्यादि देशांचा दौरा करून परत आलें. आग्नेय आशिआंतील देशांत विजेचे पंखे, शिवणाचीं यंत्रें, यांत्रिक हत्यारें, साखरेची यंत्रसामुग्री, इत्यादि मालास अजून बराच वाव आहे असें मंडळाला आढळून आलें. सध्यां दरसाल फक्त ५०,००० रुपयांच्या मालाची निर्यात होत असते.

**शिलकी गव्हाचा बटवडा**—कॅनडा व अमेरिका ह्यासारख्या देशांत जरूरीपेक्षा अधिक गहूं पिकतो व तो सांठवून ठेवावा लागतो. गहूं निर्यात करणारे सर्व देश असा शिलकी गहूं गरजू देशांना पुरविण्याची एक योजना तयार करीत आहेत. हा जादा गहूं मुख्यतः आशिआंतील देशांना धाडण्यांत येण्याचा संभव आहे. ऑस्ट्रेलिआहि गरजेपेक्षा अधिक गहूं पिकवितो.

**नाविक दलाला लागणारें सामान**—भारताच्या नाविक दलाला लागणारें नाना प्रकारचें सामान आतां देशांतील खाजगी मालकीच्या कारखान्यांतून तयार होऊं लागलें आहे. सामानाचा दर्जा नौदलाच्या अधिकाऱ्यांकडून ठरविण्यांत येतो व त्याप्रमाणें माल तयार केला जातो. पूर्वी बरेचसें सामान परदेशांतून मागवावें लागे व त्यापायीं परदेशीय चलन खर्च होई.

**नवीन प्रकारचीं एंजिनें**—चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांत आतां नवीन प्रकारचीं एंजिनें तयार करण्यांत येऊं लागलीं आहेत. हीं एंजिनें मोठ्या शहरांतील उपनगरांपर्यंतची प्रवाशांची वाहतूक करण्यास उपयोगीं पडतील. चित्तरंजन येथील कारखान्यांतून आतांपर्यंत मालगाड्यांना उपयोगीं पडतील अशीं रुंद रुळावरील एंजिनें तयार होत असत.

**चंद्रलोकाचा प्रवास, हा वेडेपणा**—तांत्रिक प्रगतीच्या सध्याच्या अवस्थेंत चंद्रावर जाण्याचा प्रयत्न करणें हा वेडेपणा आहे, असें मत केंब्रिज विद्यापीठांतील एका खगोलशास्त्रज्ञानें व्यक्त केलें आहे. १,००,००० टन वजनाचा अग्निबाण आकाशांत भिरकावितां येईल, तेव्हांच हें शक्य होईल. इतकी प्रगति होण्यास आणखी १० वर्षें लागतील, असेंहि त्याचें म्हणणें आहे.

**परदेशांतील विम्याचा धंदा**—आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् हे मलाया व सिंगापूरचा दौरा करून परत आले. ह्या देशांतून भारताला आयुर्विम्याचें काम अधिक प्रमाणांत मिळूं शकेल असा त्यांचा दावा आहे. ह्या देशांत अधिक नवा धंदा मिळविण्याच्या हेतूनें कॉर्पोरेशन एक योजना तयार करीत आहे. ह्या भागांत कॉर्पोरेशनची एक विभाग कचेरी आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## श्री. हेरेकर व श्री. मुतुर

### बेळगांव बँकेचे नवे चेअरमन व व्हा. चेअरमन

दि बेळगांव बँक लि. चे १९५९–६० वर्षाकरितां चेअरमन म्हणून श्री. एस्. जी. हेरेकर आणि व्हाइस चेअरमन म्हणून श्री. एस. एम. मुतुर ह्यांची योजना झाली आहे.

## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

बँकेस ३१–१२–१९५८ च्या साळअखेरच्या व्यवहारांत मागील साल्चा शिल्लक नफा रु. २,३७३·९५ जमेस धरून एकूण रुपये ६६,९८६·८० एवढा नफा झालेला आहे.

सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत आली.

| | |
|---|---|
| (१) रिझर्व्ह फंड | १३,०००·०० |
| (२) कॉन्टिजन्सी फंड | ३,२००·०० |
| (३) नोकरवर्गाकरितां बोनस | ४,७२५·०० |
| (४) डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड | ३,०००·०० |
| (५) इन्कम् टॅक्स तरतूद | २५,०९२·५१ |
| | ४९,११७·५१ |

बाकी नफा रु. १७,८६९·२९ रहातो. त्याची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत आली.

| | |
|---|---|
| डिव्हिडंड, ऑर्डिनरी शेअर्सवर ७% प्रमाणें करमाफ व ५% व ६% प्रमाणें प्रेफरन्स शेअर्सवर कर वजा जातां | १६,५३१·१० |
| पुढील साळाकरितां वर्ग | १,३३८·१९ |
| एकूण | ६६,९८६·८० |

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येतें.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत याची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

१९५८ सालीं ठेवींवरील दिलेलें व्याज, नोकरवर्गास दिलेला बोनस व इतर खर्च वजा जातां, ता. ३१–१२–१९५८ इ. अखेरचा निव्वळ नफा रु. १,०६,५१५–७१ इतका झाला आहे. नफ्याच्या या रकमेंत, मागील सालचा पुढें ओढलेला नफा रु. ५३८–९१ मिळविल्यावर एकूण नफा रु. १,०७,०५४–६२ होतो.

| | रु. |
|---|---|
| एकूण नफा ... ... | १,०७,०५४–६२ |
| यांतून वजा : ता. ३०–६–१९५८ रोजीं संपलेल्या सहामाहीकरितां, भागीदारांना प्रत्येक शेअरमागें भरलेल्या भांडवलावर द. सा. द. शें. ४ टक्केप्रमाणें म्हणजे प्रत्येक शेअरला रु. दहा प्रमाणें करमाफ इंटेरियम डिव्हिडंड दिले ती रक्कम | १२,०००–०० |
| | रु. ९५,०५४–६२ |

सदर राहिलेले रु. ९५,०५४–६२ या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें करण्यांत आली.

| | रु. |
|---|---|
| (१) इन्कम् टॅक्सकरितां तरतूद | ४७,५००–०० |
| (२) इन्व्हेस्टमेंट खातीं जमा करणेसाठी | ११,०००–०० |
| (३) डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडाकडे वर्ग करणेसाठी ... ... ... | ३,०००–०० |
| (४) ता. १-७-१९५८ ते ता. ३१-१२-१९५८ अखेर संपलेल्या सहामाहीकरितां, भागीदारांना प्रत्येक शेअरमागें भरलेल्या भांडवलावर द. सा. द. शें. ११ टक्केप्रमाणें म्हणजे प्रत्येक शेअरला रु. २७–५० नये पैसे प्रमाणें करमाफ फायनल डिव्हिडंड (म्हणजे सबंध वर्षासाठी प्रत्येक शेअरला दर द. सा. द. शें. ७॥ टक्केप्रमाणें करमाफ डिव्हिडंड दिल्यासारखें होईल.) | रु. ३३,०००–०० |
| (५) पुढील सालचे हिशेबांत ओढण्यासाठी | रु. ५५४–६२ |
| | रु. ९५,०५४–६२ |

**धोतरें व साड्या ह्यांचें उत्पादन**—आंध्र प्रदेश सरकारनें मध्यवर्ती सरकारला असें सुचविलें आहे कीं, धोतरें व साड्या ह्यांचें उत्पादन गिरण्यांकडून न करवितां हातमागाकरतां राखून ठेवण्यांत यावें. हातमागाच्या कापडाचा धंदा मंदीच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें त्याला मदत करण्यासाठी ही सूचना करण्यांत आली आहे.

**धंदेवाल्यांना मदतीची सोय**—आंध्र प्रदेश चेंबर ऑफ कॉमर्सनें धंदेवाल्यांना साह्य देण्यासाठी एक माहितीविभाग उघडला आहे. छोटे उद्योगधंदे काढणाऱ्यांना व व्यापाऱ्यांना विभागातर्फे विक्रीकर, मजूरविषयक कायदेकानू, कंपनीकायदा, इत्यादी बाबतींत माहिती व सल्ला पुरविण्यांत येणार आहे.

**ब्रिटिश डॉक्टर ऑस्ट्रेलिआंत जातात**—ब्रिटिश सरकारनें मोफत आरोग्ययोजना सुरू केल्यापासून तरुण इंग्लिश डॉक्टर अधिकाधिक प्रमाणांत ऑस्ट्रेलिआला जाऊं लागले आहेत. ऑस्ट्रेलिआच्या भरभराटीच्या अर्थव्यवस्थेंत अधिक पैसा मिळवितां येईल अशी डॉक्टर लोकांची अपेक्षा आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २९ एप्रिल, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ब्रिटनकडून भारताला मिळणारी मदत

भारताला आर्थिक साह्य देणाऱ्या धनको राष्ट्रांची परिषद् वॉशिंग्टन येथें भरली होती. ह्या परिषदेंत ब्रिटननें भारताला चालू आर्थिक वर्षात २ कोटी पौंड देण्याचें ठरविलें आहे असें समजतें. अजून ह्या मदतीसंबंधींची अधिकृत घोषणा करण्यांत आलेली नाहीं. सर्व धनको देशांनीं भारताला योजनापूर्वक मदत करावयाची असल्यानें ह्या बाबतींत ब्रिटनला इतर धनको राष्ट्रांशीं बोलणीं करावीं लागतील व ती होण्यास थोडासा अवधि लागेल. तथापि, भारताचे प्रतिनिधि श्री. बी. के. नेहरू ह्यांना भारताला मिळूं शकणाऱ्या एकूण मदतीची कल्पना देण्यांत आलेली आहे. भारताला आर्थिक साह्य करणारे देश म्हणजे अमेरिका, ब्रिटन, कॅनडा व जर्मनी हे प्रमुख होत. ह्या सर्वांकडून मिळून सुमारें २५ कोटी पौंडांची मदत भारताला मिळणार आहे ब्रिटनकडून मिळणाऱ्या मदतीबाबतच्या अटीच काय त्या आतां ठरावयाच्या आहेत. ब्रिटनकडून मिळणारी मदत दोन भागांत विभागली जाण्याचा संभव आहे. त्यांपैकीं एका भागांत मिळणाऱ्या कर्जाची मुदत २० वर्षांची व दुसऱ्या भागांत मिळणाऱ्या कर्जाची मुदत १० वर्षांची राहील. ह्या वर्षी मिळणारी ब्रिटनची मदत अपेक्षेइतकी नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. पण ह्याचीं दोन कारणें सांगण्यांत येत आहेत. एक असें कीं, खुद्द ब्रिटनलाच स्वतःच्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावें लागणार आहे. दुसरें असें कीं, इतर धनको देशांप्रमाणेंच ब्रिटनचेंहि असें मत आहे कीं चालू सालीं भारताला असणाऱ्या आर्थिक अडचणींचें स्वरूप मागील वर्षांतील अडचणी इतकें गंभीर नाहीं. गेल्या वर्षी देण्यांत आलेल्या मदतीचाहि अजून पूर्ण फायदा घेण्यांत आलेला नाहीं, ही गोष्ट ब्रिटनच्या लक्षांत आलेली आहे.

---

## बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याविरुद्ध इषारा

मद्रास येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे एजंट श्री. डी. एस्. शास्त्री ह्यांनीं सदर्न इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना बँकांच्या राष्ट्रीयीकरणाविरुद्ध इषारा दिला आहे. ते म्हणाले कीं, बँकांचें राष्ट्रीयीकरण करणें म्हणजे सोन्याचीं अंडीं देणाऱ्या हंसीला ठार मारण्यासारखें आहे. भारत स्वतंत्र झाला त्या वेळीं देशाची आर्थिक प्रगति ३०० ते ४०० वर्षेपर्यंत खुंटून राहिली होती. पांचदहा वर्षांच्या अवधींत व्यापार व उद्योगधंदे ह्यांची झपाट्यानें प्रगति घडवून आणावयाची होती, तेव्हां देशाच्या हिताच्या दृष्टीनें लोकशाहीच्या कांहीं पद्धती बाजूला साराव्या लागणें अपरिहार्य होतें. रिझर्व्ह बँक व स्टेट बँक राष्ट्रीय मालकीच्या झाल्या असल्या तरी खाजगी मालकीच्या बँका तशा होतीलच असें आज सांगतां येत नाहीं. हुकूमशाही देशांत पतीवर चालणाऱ्या बँकेसारख्या संस्था प्रथम राष्ट्रीय मालकीच्या करण्यांत येतात हें खरें. पण भारत एक सार्वभौम लोकसत्ताक देश आहे. तेव्हां जोंपर्यंत खाजगी मालकीचे उद्योगधंदे ह्या देशांत आहेत तोंपर्यंत खाजगी मालकीच्या बँकाहि असतील असें खात्रीलायक सांगतां येईल. ह्या संदर्भात आयुर्विमा कॉर्पोरेशनचें उदाहरण लागूं पडत नाहीं. विमेदारानें एकदा विमा उतरला कीं त्याला विम्याची मुदत भरेपर्यंत हप्ते भरावेच लागतात. मग विमा घेणारी संस्था खाजगी मालकीची असो किंवा सरकारी मालकीची असो. बँकांत ठेवी ठेवणारांची गोष्ट तशी नाहीं. अमुक एक मुदत भरेपर्यंत ठेव ठेवलीच पाहिजे असें बंधन त्याच्यावर नसते. ठेवीदाराला आपली ठेव काढून घेण्यास कोणतेंहि कारण पुरूं शकेल आणि त्याच्याकडून ठेव परत करण्याची मागणी आल्यावर बँकेला पुरवावीच लागेल.

---

## साखरेची टंचाई होण्याचा संभव

गेल्या कांहीं वर्षांत भारतांत साखरेचे नवे नवे कारखाने निघाले व अजूनहि निघत आहेत. ह्या कारखान्यांमुळें भारत साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण झाला आहे असें सांगण्यांत येतें. पण १९५८-५९ सालचा गळिताचा हंगाम जसजसा संपत चालला आहे तसतशी साखरेची टंचाई निर्माण होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. साखरेचे कारखानदार आणि व्यापारी ह्या दोघांचेंहि लक्ष ह्या परिस्थितीकडे लागलें आहे. १९५८-५९ सालचा गळिताचा हंगाम सुरू झाला त्या वेळीं साखरेच्या उत्पादनाबाबत करण्यांत आलेले अंदाज बिनचूक ठरलेले नाहींत. हंगाम आतां संपत आला आहे आणि उत्पादन सुमारें १८·७५ लाख टन होईल असा दुरुस्त अंदाज आतां करण्यांत येत आहे. हंगाम सुरू झाल्यापासून मार्च अखेरपर्यंत साखरेचें उत्पादन १६·९७ लाख टन झालें होतें. मागील हंगामांत ह्याच कालावधींत १७·१४ लाख टन उत्पादन झालें होतें. एप्रिल व मे महिन्यांत सामान्यपणें उत्पादन कमी होतें. तेव्हां ह्या दोन महिन्यांत होणारें उत्पादन जमेस धरूनसुद्धां एकूण उत्पादन मूळ अंदाजापेक्षां बरेंच कमी होण्याची शक्यता आहे. उत्पादनाचा मूळचा अंदाज २० ते २१ लाख टनांचा होता. उलटपक्षीं, देशांतील साखरेचा खप मात्र वाढत चालला आहे. दरमहा १,७०,००० ते १,७२,००० टन साखर कारखान्यांबाहेर जाते. ह्या हिशोबाप्रमाणें सुमारें २०·५० लाख टन साखर लागेल. गेल्या सालांतील शिलकी साखर ३·६७ लाख टन होती. मागील वर्षाची शिल्लक व चालू हंगामाचें उत्पादन ह्यांमधून देशांतील गरज भागवून शिवाय ५०,००० टन साखर निर्यात करावयाची आहे.

---

**करमणूक कर माफ**—मुलांना दाखविण्यासाठी मुद्दाम तयार करण्यांत आलेल्या 'बाल रामायण' ह्या चित्रपटाच्या खेळांवर करमणूक कर घेण्यांत येणार नाहीं असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. पूर्वी ही माफी विदर्भ, मराठवाडा, सौराष्ट्र व कच्छ ह्या भागांना लागू नव्हती. आतां माफी सर्व मुंबई राज्यभर लागू आहे.

## सुती कापड गिरण्यांचें आधुनिकीकरण

### देशी यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी अल्प मुदतीचीं कर्जे

सुती कापडाच्या आणि तागाच्या गिरण्यांच्या आधुनिकीकरण व पुनर्वसन कार्यांच्या प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी राष्ट्रीय औद्योगिक विकास कॉर्पोरेशननें एक नवी योजना संमत केली आहे. या योजनेनुसार हें कॉर्पोरेशन सुती कापड व ताग गिरण्यांना नवीन यंत्रसामग्री बसविण्यासाठी आणि जुनी झालेली यंत्रसामग्री बदलण्यासाठी अल्प मुदतीचीं कर्जे देईल. तथापि ही योजना केवळ भारतांत तयार झालेल्या यंत्रसामग्रीच्या खरेदीच्या बाबतींतच लागू राहील.

नवीन यंत्रसामग्री बसविण्याची इच्छा असलेल्या कोणत्याहि सुती कापड किंवा ताग गिरणीला बसवावयाच्या एकूण यंत्रसामग्रीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम ह्या कॉर्पोरेशनकडे भरल्यास कॉर्पोरेशन ही यंत्रसामग्री संबंधित गिरण्यांना उपलब्ध करून देईल. बाकीची ७५ टके रक्कम ६ टक्के दरानें ५ समान वार्षिक हप्त्यांत फेडावयाची आहे. संबंधित गिरण्यांचे मॅनेजिंग एजंटस किंवा दोन संचालक यांना रकमेच्या परतफेडीची हमी द्यावी लागेल. तथापि एकूण रकमेच्या ४० टक्के रकमेचा कॉर्पोरेशनकडे आगाऊ भरणा करणाऱ्या गिरण्यांचे बाबतींत अशी हमी देण्याची अट राहणार नाहीं.

सुती कापड गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकीं बहुतेक यंत्रसामग्री भारतांत तयार होऊं लागली असून, विशेषतः ह्या गिरण्यांच्या आधुनिकीकरणास साह्य करण्याच्या हेतूनें ही योजना मुख्यत्वें तयार करण्यांत आली आहे.

यंत्रसामग्री बसविण्यासाठी आणि पुनर्वसनाकरितां हें कॉर्पोरेशन पूर्वीपासूनच कर्जे देत आहे. १५ वार्षिक हप्त्यांत ह्या रकमांची परतफेड करावी लागते. आधुनिकीकरणासाठी आणि पुनर्वसनाकरितां आतांपर्यंत या कॉर्पोरेशननें निरनिराळ्या सुती कापड आणि ताग गिरण्यांना एकूण साडेसात कोटी रुपयांची कर्जे दिलीं आहेत. ह्या कॉर्पोरेशननें दिलेल्या ह्या साह्यांतून आणि ताग गिरण्यांच्या स्वतःच्या उत्पन्नांतून आतांपर्यंत एकूण ६० टक्क्यांहून अधिक तागाच्या गिरण्यांचें आधुनिकीकरण करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें सुती कापड गिरण्यांचें आधुनिकीकरण करण्याच्या कार्याचा वेग वाढला असून ह्या साह्यामुळें तो त्याहून अधिक वाढेल अशी अपेक्षा आहे.

तसेंच, या योजनेनुसार, सुती कापड व ताग गिरण्यांच्या उत्पादकांच्या यंत्रसामग्रीला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीहि साह्य करण्यांत येईल.

---

### देशी साहित्याची वाढत्या प्रमाणांत खरेदी

१९५३–५४ मध्यें एकूण ६५ कोटी रु. किंमतीच्या मालाच्या खरेदींत देशी साहित्याचें प्रमाण ५८ टक्के होतें. तें १९५७–५८ च्या एकूण २०० कोटी रु. किंमतीच्या मालाच्या खरेदींत ८० टक्क्यांवर गेलें आहे. अटळ अशा बाबतींतच परकीय साहित्याची खरेदी करण्यांत आली. १९५५–५६ मध्यें खरेदी करण्यांत आलेल्या एकूण ३७ कोटी रु. किंमतीच्या मालापैकीं देशी साहित्याचा वांटा २३ कोटी रु. चा होता. १९५७–५८ चे हे आंकडे अनुक्रमें ६४ कोटी रु. व ५४ कोटी रु. होते.

मध्यवर्ती खरेदी संघटना या क्षेत्रांतील साधनांचा उपयोग करून घेण्याचे सर्व प्रयत्न करीत असते. १९५८–५९ च्या पहिल्या ११ महिन्यांत कुटीरोद्योगांतून व या उद्योगधंद्यांतून ५ कोटी रु. किंमतीच्या मालाची खरेदी करण्यांत आली.

### पेटंटसाठी येणाऱ्या अर्जांत वाढ

एकोणिसशें सत्तावनमध्यें पेटंटकरितां करण्यांत आलेल्या अर्जांची संख्या ३४५६ असल्याचें पेटंट ऑफिसच्या १९५७ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें. १९५६ चा हा आंकडा ३०६७ होता. यावरून भारतांत शोधांचे बाबतींत निर्माण झालेल्या वाढत्या लक्षाची कल्पना येते.

या वर्षांत भारतांतून पेटंटांसाठी करण्यांत आलेल्या अर्जांची संख्याहि १९५६ मधील ५४० वरून १९५७ मध्यें ६०९ वर गेली. यांपैकी ५२७ अर्ज भारतीयांनीं केले होते. भारतांतून करण्यांत आलेल्या या अर्जांपैकीं मुंबई, प. बंगाल व दिल्ली या राज्यांचे मिळून ७४ टक्के अर्ज होते. पेटंटांसाठी करण्यांत आलेले अर्ज उद्योगधंदे व तंत्रविद्या क्षेत्रांत लावण्यांत आलेल्या शोधांसंबंधीं होते.

अन्नक्षेत्रांत, वाफेवर चालणारे कुकर्स, टिफिन कॅरिअर्स व चरबी आणि चरबयुक्त तेलें काढण्यासंबंधीं भारतीयांनीं शोध लावले; तर परकीयांनीं, अन्नाचें जतन, साखर काढणें व शुद्ध करणें आणि गुरांचें खाद्य, यांबाबत नवीन शोध लावले होते. त्याचप्रमाणें शेतकी अवजारें, खतें यांत सुधारणा, धान्यांवर व बियाण्यांवर प्रक्रिया यांवरील शोधहि परकीयांचेच होते. जंतुनाशकांवरील पेटंटांसाठीहि अनेक अर्ज आले होते.

रासायनिक धंद्यानें या वर्षींच्या शोधांतहि आपलें प्रभुत्व टिकविलें. हे शोध प्रामुख्यानें रंगपदार्थ, नैसर्गिक व कृत्रिम औषधें, हार्मोन्स व कृत्रिम राळ यांना होते. लोखंड व पोलाद, विद्युत्‌शक्ति, स्थापत्यशास्त्र, कापड तंत्रविद्या, या क्षेत्रांतील शोधांसाठी करण्यांत आलेले बरेच अर्ज परदेशचे होते.

डिझाइन्सच्या नोंदणीसाठी केलेल्या अर्जांच्या संख्येंत या वर्षीं घट झाली आहे. गतवर्षीं अशा ४३७६ अर्जांची नोंदणी झाली होती. १९५७ चा हा आंकडा ४३०३ आहे. यांपैकी जवळजवळ ९९ टक्के अर्ज भारतांतूनच आले होते.

सदर वर्षांत पेटंट कचेरीस एकूण ९·५३ लाख रुपयांवर उत्पन्न, तर ५·२७ लाख रुपये खर्च आला. १९५६ चे हेच आंकडे अनुक्रमें ८·७७ लाख रुपये व ५·६५ लाख रुपये असे होते.

---

### स्वस्त किंमतीच्या मोटारी बनविण्याच्या शक्याशक्यतेची पाहणी

मोटारधंद्यानें केलेल्या प्रगतीचें मूल्यमापन करून सामान्य माणसाला घेण्यास परवडेल अशी मोटार बनविण्याची शक्याशक्यता पाहण्यासाठी भारत सरकारनें एक समिति स्थापन केली आहे. कमी म्हणजे ५ हजार ते ७ हजार रुपये किंमतीची मोटार बनविण्याची शक्याशक्यता कितपत आहे, याचाहि ही समिति विचार करील. ही समिति सरकारकडे पूर्वी सादर केलेल्या योजनांचीच नव्हे तर निरनिराळ्या देशांतील मोटारींच्या इतर मॉडेलांची तपासणी करील व तशा मोटारी भारतांत तयार करण्यासाठी उपाययोजना सुचवील. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील निरनिराळ्या प्रकारच्या मोटारगाड्यांच्या उत्पादनाच्या लक्ष्यांबाबतहि ही समिति आपल्या शिफारशी सादर करील. त्याचप्रमाणें मोटारी, जीप, ट्रक, यांसारख्या निरनिराळ्या प्रकारच्या गाड्यांची ग्राहकांस पडणारी किंमत कमी करण्यासाठी कोणते उपाय योजावेत यांबद्दलच्या सूचनाहि या समितीनें करावयाच्या आहेत.

## ' सर्व्हिस कोऑपरेटिव्हज् ' कडून अपेक्षा

### सहकारी शेतीच्या मार्गातील पहिलें पाऊल : अनुकूल वातावरण तयार करण्याची अपेक्षा

लेखक : श्री. श्रीमन् नारायण, नियोजन मंडळाचे सदस्य

सहकारी शेतीच्या अर्थशास्त्रासंबंधी लोकांमध्यें व वर्तमान-पत्रांतून बरीच चर्चा होत असल्यानें ह्या प्रश्नाचा वस्तुनिष्ठ व शास्त्रीय दृष्टीकोनांतून विचार करणें अगत्याचें व उपयुक्त ठरेल.

सहकारी शेतीची कल्पना नवी नाहीं. लहान शेतकऱ्यांना सहकारी शेती–संस्था स्थापन करण्यास उत्तेजन व मदत देण्याच्या हेतूनें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत अनेक सूचना करण्यांत आल्या होत्या. सहकारी शेतीचे मोठाले कार्यक्रम आंखण्याची राज्य सरकारांना त्यावेळीं विनंती करण्यांत आली होती; परंतु दुर्दैवानें त्या दिशेनें फारच थोडे प्रयत्न झाले. सहकारी शेतीचा त्वरित विकास घडवून आणावयाच्या धोरणावर सर्वत्र एकमत असल्याचें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत नमूद करण्यांत आलें होतें. " द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या कालखंडांत यासंबंधीची महत्त्वाची जबाबदारी म्हणजे सहकारी शेतीचा पाया मजबूत करणें व तिच्या योजनाबद्ध विकासासाठी पावलें टाकणें, ही आहे. असें झाल्यास येत्या दहा वर्षांत देशांतील बऱ्याच मोठ्या जमिनीची सहकारी तत्त्वावर मशागत होऊं शकेल." प्रत्येक राज्याशीं चर्चा करून सहकारी शेतीचे इष्टांक ठरविण्यांत येणार होते. परंतु या ना त्या कारणानें राज्य सरकारांनीं यासंबंधीच्या कार्यक्रमांचा पद्धतशीरपणें पाठपुरावा केला नाहीं. त्याचप्रमाणें संयुक्त सहकारी शेतकी पद्धतीबाबत कांहीं शंका व मतभेद असल्यानें या कार्यक्रमांची प्रगति फारच सावकाश होत गेली.

### सहकारी शेतीचे तीन प्रकार

वस्तुस्थिति अशी आहे कीं, सहकारी शेतीच्या व्याख्येच्या बाबतींत असलेली थोडीफार संदिग्धता तिच्या गुणदोषांच्या बाबतींत एवढा गोंधळ उडविण्यास कारणीभूत होत आहे. सहकारी शेतीचे तीन प्रकार आहेत. सहकारी संयुक्त शेतीचा एक प्रकार आहे. या प्रकारांत जमिनीची मालकी कायम राहते परंतु निरनिराळ्या कुटुंबांची जमीन एकत्र आणली जाते आणि वर्षअखेर जमिनीच्या मालकीच्या प्रमाणांत उत्पन्नाची वांटणी केली जाते. अशा सहकारी शेतींतील सदस्य कांहीं अटींवर त्या संघटनेंतून आपली जमीन परत मिळवूं शकतात.

यानंतर दुसरा प्रकार म्हणजे सहकारी समाईक शेती संस्थांचा. येथें जमिनीबरोबरच वैयक्तिक मालकी, शेतकी उपकरणीं व साधनें देखील या संस्थांकडे येतात व त्यावर कोणा एकाची मालकी रहात नाहीं. उत्पन्नाची वांटणी प्रत्येक सदस्यानें केलेल्या श्रमावर ठरविली जाते. सोव्हिएत रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांतील कोल्कोज पद्धतीशीं मात्र या पद्धतीचा कांहीं एक संबंध नाहीं. कारण कम्युनिस्ट राष्ट्रांत संस्थेचें स्वयंस्फूर्त सदस्यत्व, स्वयंनिर्णयाचा व स्वयंशासनाचा हक्क, या गोष्टींना थारा नसतो.

त्यानंतर तिसऱ्या प्रकारांत, तणें उपटणें, कापणी करणें, ढेंकळे फोडणें, खतपाणी देणें, व विक्री करणें यासारख्या शेतकीसंबंधीच्या कामांच्या विविध सहकारी संस्था स्थापन करतां येतात. सेवा सहकारी संस्थांमार्फत ( सर्व्हिस को-ऑपरेटिव्हज् ) अशा स्वरूपाचीं शेतकींतील कामें परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर पार पाडतां येतात. सहकार या विषयाचे जर्मन तज्ज्ञ डॉ. ऑटो शिलर या पद्धतींचें वर्णन " आपल्या मालकीच्या शेतीची सहकारी पद्धतीनें केलेली मशागत " असें करतात.

सहकारी शेतीच्या या तीन पद्धतींचे प्रयोग करण्यास भारतांत भरपूर वाव आहे. अशा प्रकारचे प्रयोग हातीं घेतांना त्यांत ठोकळेबाजपणा नसावा आणि स्थानिक परिस्थितीस अनुसरून सहकारी शेतीच्या विविध पद्धतींच्या स्वयंस्फूर्त विकासास पूर्णपणें मोकळीक असावी. द्वितीय पंचवार्षिक योजनेंत यासंबंधीं म्हटलें आहे, " विकासाच्या या पातळीवर जमीन एकत्रित कशी करावी व सहकारी संस्थांचा कारभार कसा चालवावा या बाबतींत लवचिक धोरणाची फार आवश्यकता भासेल. " वेगवेगळ्या परिस्थितींत, त्या त्या परिस्थितीस अनुरूप अशा विविध सहकारी संघटना उभाराव्या लागतील आणि चांगलें यश मिळविण्यासाठी अनेक वेगवेगळ्या घटकांना एकत्र आणावें लागेल. उदाहरणार्थ, एखादें शेत एक स्वयंपूर्ण घटक कल्पून कांहीं बाबतींत वा सर्वच बाबतींत त्याचा व्यवहार होईल. एखाद्या सहकारी शेतींत कांहीं कुटुंबें उप-विभागांची स्थापना करतील किंवा सहकारी विकासाच्या पहिल्या अवस्थेप्रमाणें कुटुंबाच्या स्वतंत्र जमिनी ठेवून कांहीं ठराविक कामें संयुक्त रीत्या पार पाडतील. दुसऱ्या योजनेंतील यासंबंधीचा कांहीं मजकूर येथें उद्धृत करणें उपयुक्त ठरेल; " निरनिराळ्या परिस्थितींत शेतकी व इतर कार्यक्रम सहकारी पद्धतीनें पार पाडतांना बराच प्रात्यक्षिक अनुभव गोळा करावा लागेल आणि सर्व कामें यथास्थित पार पाडतांना प्रायोगिक दृष्टिकोन ठेवावा लागेल. पद्धतशीर अभ्यास व निरीक्षण करून चांगले निष्कर्ष काढण्याबाबत प्रयत्नशील रहावें लागेल आणि शेतकऱ्यांना परिस्थितीनुरूप ते त्वरित उपयोगांत आणतां यावें यासाठी त्यांचा बराच प्रसार करावा लागेल.

### स्वयंस्फूर्त सहकार्य

प्रधानमंत्री श्री. नेहरू यांनीं आपल्या एका निवेदनांत नुकतेंच स्पष्ट केलें आहे कीं, सहकारी शेती ही सामायिक शेतीपेक्षा अगदीं वेगळी आहे आणि संयुक्त सहकारी शेती भारतीय शेतकऱ्यांवर लादण्याचा आमचा केव्हांहि इरादा नाहीं. सहकारी प्रयत्नांचा प्रारंभ म्हणून देशभर मोठ्या प्रमाणावर सेवा सहकारी कार्यक्रमांचें जाळें विणण्याचा मानस मात्र आहे. भारतांतील शेतकी सुधारणेच्या दृष्टीनें सेवा सहकारी संस्था चांगलें काम करूं शकतील याबाबत दुमत होऊं शकणार नाहीं असें वाटतें. ज्या वेळीं अशा स्वरूपाच्या सेवा सहकारी संस्थांचें स्वयंस्फूर्तपणें संयुक्त सहकारी शेती संस्थांत रूपांतर करण्याचा शेतकरी प्रयत्न करतील तेव्हां मात्र त्या प्रयोगासाठी आवश्यक तें साह्य दिलें गेलें पाहिजे. अशा संयुक्त सहकारी शेतांचा व्याप फार मोठा नसावा हें स्पष्ट केलें पाहिजे. रशिआंतील एका सामाजिक शेतीचें क्षेत्रफळ दहा, वीस, तीस किंवा प्रसंगीं चाळीस हजार एकरांचें देखील असूं शकतें. इतका त्यांचा व्याप प्रचंड आहे. मला असें वाटतें कीं, आपल्या देशांत फक्त २५, ५०, किंवा १०० कुटुंबांनीं आपली जमीन एकत्र आणून एकाच कुटुंबाचे घटक या नात्यानें सामुदायिक रीत्या शेतीच्या मशागतीचीं व इतर कामें करावींत. संयुक्त सहकारी शेतीसाठी एकत्र येणाऱ्या कुटुंबांत परस्पर जिव्हाळा, स्नेहसंबंधाचे संबंध आणि एकमेकांना साह्य करण्याची वृत्ति असली पाहिजे, तरच संयुक्त शेती यशस्वी होऊं शकेल. ग्रामदानी गांवांतील शेतकरी आपले वैयक्तिक जमीन मालकीचे हक्क गांवाच्या कल्याणासाठी आपणहून सोडून

देत असल्यानें संयुक्त सहकारी शेतीसाठी अशीं गांवें योग्य ठरतील असें वाटतें. नव्यानें सुधारून लागवडीखालीं आणलेल्या शेतकी वसाहतींतून संयुक्त सहकारी शेतीची अंमलबजावणी किफायतशीर ठरेल.

### गांधीजींचा पाठिंबा

भारतांत सहकारी पद्धतीनें शेती करण्यास गांधीजी अनुकूल होते ही विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. १५ फेब्रुवारी १९४२ च्या "हरिजन"च्या अंकांत ते म्हणतात : "शेतकींत सहकारी पद्धतीचीं कास धरल्याशिवाय आपली जमीन आपल्याला पुरेपूर लाभ मिळवून देऊं शकणार नाहीं याबद्दल माझी खात्री आहे." सहकारी पद्धतींत जमिनींची मालकी सहकारी स्वरूपाची राहील आणि तिची मशागत देखील सहकारी तत्त्वावर केली जाईल अशी गांधीजींची सहकाराविषयींची कल्पना होती. "लोकांत एकमेकांविषयीं मैत्रीची भावना वाढीस लागल्यास आणि एकाच कुटुंबाचे घटक असल्याप्रमाणें त्यांनीं समाजांत वावरल्यासच हें शक्य आहे," असें तें पुढें म्हणत. निव्वळ सेवा सहकारी संस्थांच्या स्थापनेपेक्षा गांधीजी संयुक्त सहकारी शेतीसच अनुकूल होते ही गोष्ट लक्षांत ठेवणें उपयुक्त ठरेल. प्रधानमंत्र्यांचा या बाबीकडे पाहण्याचा दृष्टिकोन जास्त सावधानतेचा असून त्यांचा एकदम आमूलाग्र बदल घडवून आणण्यावर भर नाहीं.

सहकारी शेती म्हणजे जमीनमशागतीचें यांत्रिकीकरण असा समज करून घेण्यांत मुळींच अर्थ नाहीं. कसून मशागत केलेल्या छोट्या क्षेत्रफळाच्या जमिनींपेक्षा यांत्रिक पद्धतीनें मोठ्या क्षेत्रफळाच्या जमिनीची मशागत केल्यास दर एकरीं अधिक पीक हातीं येतें हा समज चुकीचा आहे. खरी गोष्ट अशी आहे, शेतकींत दर एकरीं उत्पादनाचे आंकडे स्पष्टपणें दर्शवितात कीं, सर्वसाधारणपणें, कसून मशागत केलेल्या छोट्या क्षेत्रफळाच्या जमिनींतील एका एकरांत, मोठ्या क्षेत्रफळाच्या एका एकरापेक्षा अधिक पीक हातीं येतें. मोठ्या क्षेत्रफळाच्या जमिनीवर शेतकऱ्याची उत्पादनशक्ति वाढते परंतु एकरीं उत्पादन मात्र वाढत नाहीं, ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

### स्वयंस्फूर्तीची आवश्यकता

भारतांत सहकारी शेती यशस्वी करण्यासाठी शेतकऱ्यांना साह्य करणाऱ्या त्यागी व सेवामय अशा अनेक प्रामाणिक व कुशल कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याची फार तीव्रतेनें आवश्यकता भासेल व तशी व्यवस्थाहि करावी लागेल. असें प्रामाणिक व कुशल कार्यकर्ते मिळूं न शकल्यास सहकारी शेती म्हणजे आर्थिक पिळवणुकीचा एक नवा प्रकार म्हणून ओळखला जाईल. नियोजित कार्यक्रमानुसार देशांतील सहकारी शेतीचे प्रयोग यशस्वी होणार नाहींत असें नाहीं. सेवा सहकारी संस्थांचें प्रारंभींचें यश अनुकूल वातावरण निर्माण करील व त्यामुळें त्यापुढील पायरी म्हणून भारतांतील शेतकरीवर्ग संयुक्त सहकारी शेतीसंस्था स्थापण्याच्या दिशेनें पाऊल टाकील. अशा प्रकारच्या सहकारी संस्था लोकांनीं आपणहून पुढें येऊन स्वयंस्फूर्तपणें स्थापन कराव्या, हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. कोणत्याहि प्रकारच्या दडपशाहीला वा सक्तीला तेथें वाव असता कामा नये.

---

**कच्छच्या रणाचे ३,००० चौ. मैल पाकिस्तानला हवेत**

कच्छच्या रणाच्या ३,००० चौरस मैल क्षेत्रावर आपला हक्क असल्याचें पाकिस्ताननें रेडिओद्वारां पुन्हां जाहीर केलें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८५,५०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वायू. एस्. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१८५ |
| रिझर्व्हज् | रु. १,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ७७,००,०००चे वर |

★ रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ शॉर्टटर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## परदेशीय प्रवाशांसाठी विश्वासार्ह व सरकारमान्य दुकानांच्या सोयींची योजना

भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांना खरेदीच्या दृष्टीनें विश्वासार्ह दुकानांची यादी मिळावी म्हणून प्रवासी व्यवसाय खात्यानें एक योजना तयार केलेली आहे. सदर योजनेनुसार महत्त्वाच्या शहरांत व प्रेक्षणीय ठिकाणीं खात्रीलायक दुकानांस मान्यता देण्यांत येईल व या खात्यांच्या योग्य त्या प्रकाशनांत सदर यादी प्रसिद्ध करण्यांत येईल. ही योजना प्रयोग म्हणून सुरू करण्यांत येत असून तीन वर्षांनंतर तिचें पुनर्विलोकन केलें जाईल. अशा दुकानांस मान्यता देण्यासंबंधींच्या अटी आणि नियम या खात्यानें ठरवून दिलेले आहेत. तरी अशी मान्यता मिळवूं इच्छिणाऱ्या दुकानांनीं व फर्मनीं अधिक तपशीलासाठी डायरेक्टर, ट्रॅव्हल ट्रेड, डिपार्टमेंट ऑफ टुरिझम, मिनिस्ट्री, ऑफ ट्रॅन्स्पोर्ट अॅण्ड कम्युनिकेशन्स थापर हाऊस, जानपथ, नवी दिल्ली, यांच्याशीं पत्रव्यवहार करावा.

## शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न, खर्च व नफा

१९५१ ते १९५७ चें तुलनात्मक आंकडे

( आंकडे कोटी रुपयांचे )

| वर्षे | उत्पन्न | खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|
| १९५१ | ४५·३४ | ३२·२९ | १३·०५ |
| १९५२ | ४७·६९ | ३६·२९ | ११·४० |
| १९५३ | ४६·१० | ३६·९६ | ९·१४ |
| १९५४ | ४८·७८ | ३९·२८ | ९.५० |
| १९५५ | ५४·९७ | ४४·५४ | १०·४३ |
| १९५६ | ६४·८९ | ५७·२७ | १३·६२ |
| १९५७ | ७९·०८ | ६३·२५ | १५·८३ |

## मार्चमध्यें नागपुरी संत्रांसाठी ९६८ वॅगन्स

मार्च, १९५९ मध्यें नागपुरी संत्र्यांच्या वहातुकीसाठी रेल्वेच्या ९६८ वॅगन्स लागल्या. मार्च, १९५८ मध्यें फक्त २७९ वॅगन्स लागल्या होत्या.

## लंडनमधील विसरभोळे

१९५७ मध्यें, लंडनमधील बसेस व लोकलगाड्या ह्यांत विसरभोळ्या उतारूंनीं खालील जिनसा विसरल्याचें आढळून आलें:—

| | |
|---|---|
| हातमोज्यांच्या जोड्या | ८२,००० |
| एका हाताचे मोजे | ३१,००० |
| चष्मे | १५,००० |
| पुस्तकें | २३,७०० |
| किल्ल्या | १३,००० |

एक कृत्रिम पाय, कुबड्यांचा एक जोड, एक स्टेरिऑस्कोप, एक तलवार आणि औषधाची एक बाटली, अशाहि वस्तू आढळल्या.

## कावेरी नदीच्या पाण्याबाबत तंटा

मद्रास सरकारनें ७०,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा करणाऱ्या कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. त्यांस म्हैसूर सरकारचा विरोध आहे. कावेरी नदीच्या पाण्याच्या वांटणीबाबत म्हैसूर व मद्रास सरकार ह्यांच्यामधील वाद निवाड्यासाठी लवादाकडे सोंपवावा, अशी विनंती म्हैसूर सरकारनें मध्यवर्ती सरकारला केली आहे.

**रशिआच्या नव्या योजना**—चालू शतकाच्या अखेरीस रशिआची लोकसंख्या ५० कोटींच्या घरांत जाईल. लोकसंख्येची ही संभाव्य वाढ लक्षांत घेऊन आर्थिक विकासाच्या योजना आंखण्यांत येत आहेत. त्यांपैकीं एक योजना अशी आहे कीं पश्चिम सायबेरिआंतील उत्तरवाहिनी नद्यांचे प्रवाह दक्षिणवाहिनी करावयाचे व ओसाड जमिनीला पाणीपुरवठा करावयाचा.

**युरेनिअम तयार करण्याची रीत**—सोव्हिएट रशिआनें समुद्राच्या पाण्यापासून युरेनिअम तयार करण्याची पद्धत शोधून काढली आहे. तशी पद्धत चालू करण्यासाठी भारतांत अद्याप प्रयत्न करण्यांत आलेले नाहींत. कारण भारतांत खनिजांपासून युरेनिअम तयार करण्याची अधिक कमी खर्चाची पद्धत उपयोगी पडते, अशी माहिती लोकसभेंत देण्यांत आली.

## भारत व राज्य सरकारांची बाजारांतील कर्जउभारणी

१९४९–५० ते १९५८–५९; आंकडे कोटी रुपयांचे

| वर्षे | मध्यवर्ती सरकार | | | राज्य सरकारें | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नवीं कर्जें | परत फेड | निव्व. कर्जें उभारणी | नवीं कर्जें | परत फेड | निव्व. कर्ज उभारणी | ए. कर्ज उभारणी (३+६) |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १९४९–५० | — | ३१·४ | – ३१·४ | ६·० | ०·७ | + ५·३ | – २६·१ |
| १९५०–५१ | ७·६ | ६·७ | + ०·९ | ७·१ | — | + ७·१ | + ८.० |
| १९५१–५२ | १२·८ | ४९·२ | – ३६·४ | ११·५ | — | + ११·५ | – २४·८ |
| १९५२–५३ | — | — | — | १५·८ | २·९ | + १२·९ | + १२·९ |
| १९५३–५४ | २३·४ | ६३·३ | – ३९·८ | ३७·० | ०·६ | + ३६·४ | – ३·५ |
| १९५४–५५ | १५८·२ | ४८·० | + ११०·१ | २·५ | २·० | + ०·५ | + ११०·६ |
| १९५५–५६ | ४५·७ | १२·४ | + ३३·३ | ५२·९ | ४·२ | + ४८·७ | + ८२·० |
| १९५६–५७ | ७७·२ | — | + ७७·२ | ६६·५ | ३·० | + ६३·५ | + १४०·७ |
| १९५७–५८ | ९१·१ | २५·२ | + ६५·९ | ८·६ | ३·८ | + ४·८ | + ७०·७ |
| १९५८–५९ | १९२·४ | ११·५ | + १८०·९ | ४९·२ | ३·२ | + ४६·० | + २२६·९ |

**अणुशक्तीवरील विजेची नवीन पद्धत**—अमेरिकेच्या शास्त्रीय संशोधन-खात्यातर्फे असें जाहीर करण्यांत आलें आहे कीं, अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करण्याची नवी पद्धत शोधून काढण्यांत यश मिळालें आहे. या पद्धतींत बॉयलर्स, वायुनियंत्रक इत्यादी नेहमीं वापरण्यांत येणाऱ्या साधनांचा उपयोग करावा लागत नाहीं.

**शिक्षणाचें माध्यम तामीळ**—१९६३ पासून मद्रासमधील कॉलेजांतून शिक्षणाचें माध्यम म्हणून तामीळ भाषेचा अवलंब केला जाण्याची शक्यता आहे. पुढील वर्षी प्रयोग म्हणून एका कॉलेजांत तरी तामीळमधून शिक्षण देण्यास प्रारंभ करण्यांत येईल. कोईमतूर येथील सरकारी कॉलेज बहुधा निवडण्यांत येईल.

**सौराष्ट्रामधील कापडाच्या गिरण्या**—सौराष्ट्र कापड-गिरणी संघाच्या अध्यक्षांनीं असें जाहीर केलें आहे कीं १९५८ सालीं सौराष्ट्रामधील गिरण्यांना ६४ लाख रुपये तोटा सोसावा लागला. चालू सालच्या पहिल्या तीन महिन्यांतहि त्यांचें कार्य समाधानकारक रीतीनें चाललेलें नाहीं. गिरण्यांची स्थिति सुधारण्यासाठी ११ कलमी योजना त्यांनीं सुचविली आहे.

**२७ हजार डॉलर्स किंमतीचा हिरा**—स्टॉकहोम येथील एका जवाहिराच्या कंपनीनें १०२ कॅरेट वजनाचा हिरा लिलांवाला काढला होता. हा हिरा पूर्वी रशिआच्या झारच्या मुगुटांत होता असें म्हणतात. लिलांव बोलण्यासाठी अनेक देशांतील खरेदीदार आले होते. त्यापैकी एका अनामिक खरेदीदारानें तो २७,००० डॉलर्सना विकत घेतला आहे.

**तेलाच्या वहातुकीसाठी नळ**—संबायतच्या आखातांत सांपडूं शकणारें तेल भावनगरमार्गे मुंबईला नेण्यासाठी तेलाचे नळ घालण्याची पहाणी तज्ज्ञांकडून पुरी झाली आहे. उपलब्ध तेल संबायतपासून भावनगरपर्यंत तेलाच्या नळानें नेण्यांत यावयाचें असून नंतर तेथून तेलवाहू बोटींच्या साह्यानें मुंबईला नेण्यांत येईल. तेलवाहू मोठ्या बोटी थांबण्याचे धक्के भावनगरला आहेत.


सांडू

प्रेग-यूटेरो

गर्भिणी-गर्भ-रक्षक





[illegible] कृष्ण सांडू ब्रदर्स [illegible] लि.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.

विशेष माहिती मुख्य कार्यालय किंवा कोणत्याही शाखेत मिळेल.

शाखा - फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · बेळगांव.

महिला शाखा - सारस्वत बँक गृह, गिरगांव-मुंबई ४.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

* दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ५८,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १¾% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी. मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.